# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १४२ वा ❑ भारतीय सौर दिनांक २५ आषाढ शके १९४८, गुरूवार दि.१६ जुलै २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# २०२६ चे ''अंबुद'' पुरस्कार जाहीर

## आम्ही गिरगावकर, संजय यादवराव, मराठी एकीकरण समिती आणि हरी पाटणकर यांचा होणार गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबई - यंदाचे ''अंबुद'' पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. आम्ही गिरगावकर आणि मराठी एकीकरण समिती या दोन संस्था आणि संजय यादवराव व हरी पाटणकर या दोन कार्यकर्त्यांचा ''अंबुद'' पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

स्वामीराज प्रकाशन आणि पल्लवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी मराठी भाषा आणि मराठी भाषिक यांच्यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांचा ''अंबुद'' पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात येतो. शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह आणि ग्रंथ भेट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.




मराठी भाषा चळवळीत ''अंबुद'' पुरस्कार अत्यंत प्रतिष्ठेचा मानला जातो. यंदा हा पुरस्कार गिरगावातील मराठी माणसांचा आवाज अशी ओळख असलेली आम्ही गिरगावकर ही संस्था, शिवराज्य चळवळीच्या माध्यमातून मराठी भाषा, शाळा, व्यावसायिक आणि नाव उद्योजक यांची मोट बांधणारे संजय यादवराव, मराठी माणसांच्या हक्कासाठी लढणारी मराठी एकीकरण समिती आणि मराठी प्रेक्षकांना नाटकाकडे वळविणारे ज्येष्ठ व्यवस्थापक हरी पाटणकर यांना जाहीर झाला आहे.

रविवार २६ जुलै २०२६ रोजी रात्री ८ वाजता दादर येथील छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यगृहात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी ''आषाढ वारी'' हा अभंगवाणीचा कार्यक्रम आप्पा वढावकर, प्रशांत काळुंद्रीकर, मानस भागवत, विद्या करलगीकर,आसावरी बोधनकर सादर करणार असून निरुपर दीप्ती भागवत करणार आहेत. भाऊ कोरगावकर आणि निलेश भोसले यांची ही निर्मिती असून सर्वांना मुक्त प्रवेश आहे.

या कार्यक्रमाला सर्व रसिकांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विशेष लेख...

# अशैक्षणिक कामांसाठी अस्थायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होत आहे, हा आजच्या शिक्षण व्यवस्थेतील एक अतिशय गंभीर आणि महत्त्वाचा विषय आहे. या समस्येमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतेच, सोबतच शिक्षकांवरही प्रचंड ताण येतो.अशैक्षणिक कामांच्या व्यस्ततेमुळे शिक्षकांना तासिका घेण्यासाठी, पाठांचे नियोजन करण्यासाठी आणि उत्तरपत्रिका तपासण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

वर्गातील मागे पडणाऱ्या किंवा अभ्यासात कमकुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे वैयक्तिकरीत्या लक्ष देणे शिक्षकांना अशक्य होते. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान  सारख्या महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा पाया कच्चा राहतो.शिक्षक सतत कागदी कामात व्यस्त राहिल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील भावनिक व शैक्षणिक संवाद कमी होतो. वर्गात नियमित आणि प्रभावी अध्यापन न झाल्यामुळे विद्यार्थ्यांचा शाळेतील रस कमी होऊ शकतो.

शाळांमधील अशैक्षणिक कामांचा ताण शिक्षकांवर येऊ नये म्हणून अशैक्षणिक कामांसाठी अस्थायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे अतिशय गरजेचे आहे. शिक्षण हक्क कायदा २००९ मधील कलम २७ नुसार, शिक्षकांना जनगणना, आपत्ती व्यवस्थापन आणि निवडणूक वगळता इतर कोणत्याही अशैक्षणिक कामांमध्ये गुंतवण्यास मनाई आहे.मात्र विविध प्रशासकीय कामे, सर्वेक्षणे, स्वच्छता अभियान हागणदारी मुक्त अभियान इतर विभागाच्या विविध योजनांसाठी विद्यार्थी लाभार्थी म्हणून नोंदणी गावातील तंटामुक्ती व इतर समित्यांवर सदस्य म्हणून काम इतर संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा आयोजित करणे, शासन शासकीय संस्था आदींचे विविध उपक्रम दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे सर्वे क्षण, पशु सर्वेक्षण, शौचालय सर्वेक्षण, आधी विविध सर्वेक्षणे शालेय कामकाजाव्यतिरिक्त अन्य विभागांची माहिती संकलित करून त्यांची माहिती ॲप व संकेतस्थळावर नोंद करणे, संगणकीय प्रणालीमध्ये उपलब्ध माहिती ऑफ लाईन पद्धतीने दुबार मागविणे प्रशिक्षणे कार्यशाळा उपक्रम अभियान मिळावे आदींमध्ये सहभाग घेणे आणि डेटा एन्ट्रीसारखी कामे शिक्षकांना करावी लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत आहे.

अशैक्षणिक कामांसाठी अस्थायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना शिक्षण हक्क कायदा  आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी नियमावली यांनुसार प्रक्रिया करणे बंधनकारक असते. यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून दूर ठेवता येते.

**कायदेशीर तरतुदी**

शिक्षण हक्क कायदा कायदा, २००९ (कलम २७): या कायद्यानुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामांसाठी (उदा. निवडणूक वगळता इतर कामे) नियुक्त करण्यास सक्त मनाई आहे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आणि दर्जेदार शिक्षणासाठी शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा भार न देण्याबाबत शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. संस्थेला किंवा शाळेला अशैक्षणिक कामांसाठी (उदा. शिपाई, कनिष्ठ लिपिक, डेटा एन्ट्री ऑपरेटर) अस्थायी कर्मचारी ठेवायचा असल्यास, संबंधित शिक्षण विभागाची किंवा शिक्षण संचालकांची पूर्वपरवानगी आवश्यक असते.हे कर्मचारी केवळ प्रशासकीय किंवा संस्थास्तरावरील कामांसाठीच नियुक्त करता येतात

याशिवाय शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्यासाठी बाह्यस्रोत  किंवा तात्पुरत्या स्वरूपात  कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यास

शिक्षकांचा पूर्ण वेळ केवळ विद्यार्थ्यांचे अध्यापन आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध होईल. यु-डायस नोंदणी, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड अपडेशन, शिष्यवृत्तीचे फॉर्म भरणे आणि इतर ऑनलाईन तांत्रिक कामे व्यावसायिक डेटा एन्ट्री ऑपरेटर किंवा लिपिकांकडून जलद गतीने पूर्ण होतील. नियमित पदभरती प्रक्रियेला वेळ लागत असल्यास, शाळा व्यवस्थापन समिती किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत तात्पुरत्या मानधनावर तरुण उमेदवारांची नियुक्ती करून तातडीची कामे निपटवून घेता येतात.

शाळांना लिपिक, डेटा एन्ट्री ऑपरेटर आणि शिपाई अशा पदांसाठी बाह्य स्रोताद्वारे (आउटसोर्सिंग) किंवा अस्थायी (कंत्राटी) कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्याची परवानगी सरकारने देणे आवश्यक आहे. शिक्षण विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभाग द्वारे शैक्षणिक आणि अशैक्षणिक कामांचे स्पष्ट वर्गीकरण केले आहे, त्यानुसार अशैक्षणिक कामांचा भार शिक्षकांवर न टाकता अस्थायी कर्मचाऱ्यांना सोपवावा. शिक्षकांकडून केवळ अध्यापनाचे काम करून घेण्याच्या दृष्टीने आर टी ई कायद्याच्या कलम २७ ची कठोर अंमलबजावणी करावी. स्थानिक स्वराज्य संस्था आणि शाळांना अस्थायी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी विशेष अनुदान अथवा निधी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग कडून उपलब्ध करून द्यावा.

शिक्षण हक्क कायद्यानुसार शिक्षकांना केवळ अध्यापन आणि अतिशय मर्यादित (निवडणूक, आपत्ती व्यवस्थापन) कामांमध्येच गुंतवावे, इतर स्थानिक सर्वेक्षणांमधून त्यांची सुटका करावी. शासकीय ॲप्स आणि पोर्टल्सची संख्या कमी करून, सर्व माहिती एकाच ठिकाणी सहज भरता येईल अशी सोपी व्यवस्था निर्माण करावी.

# आषाढ-निसर्गाचा हिरवा उत्सव..... भाग-१

**ज्योतिर्मय साहित्य**

आषाढाचे आगमन हे भारतीय संस्कृतीत, विशेषतः महाराष्ट्रात, निसर्गाच्या नवचैतन्याचे आणि भक्तीचे प्रतीक मानले जाते. हिंदू पंचांगानुसार आषाढ हा वर्षातील चौथा महिना असून तो मुख्यत्वे पावसाळ्याच्या आणि आषाढी वारीच्या आगमनाची चाहूल देतो.आषाढ आगमनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्येनिसर्गाचे रूप: आषाढाच्या सुरुवातीला आकाशात काळे ढग जमा होतात आणि आषाढघनाचे (पहिल्या पावसाचे) आगमन होते. त्यामुळे कोरडी पडलेली धरणी हिरवीगार होऊ लागते. वारकऱ्यांची पाऊले: या महिन्याच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या पालख्यांचे आणि दिंड्यांचे प्रस्थान होते. विठू माऊलीच्या ओढीने संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाऊन निघतो.शेतीची कामे: शेतकऱ्यांसाठी हा महिना अत्यंत महत्त्वाचा असतो. आषाढात पडणाऱ्या पावसामुळे शेतात पेरणी आणि लावणीच्या कामांना वेग येतो.

आषाढाचे आगमन हे भारतीय संस्कृतीत, विशेषतः महाराष्ट्रात, निसर्गाच्या नवचैतन्याचे आणि भक्तीचे प्रतीक मानले जाते.

आषाढ आगमनाचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये म्हणजे

आषाढाच्या सुरुवातीला आकाशात काळे ढग जमा होतात आणि आषाढघनाचे (पहिल्या पावसाचे) आगमन होते. त्यामुळे कोरडी पडलेली धरणी हिरवीगार होऊ लागते.

या महिन्याच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे जाणाऱ्या पालख्यांचे आणि दिंड्यांचे प्रस्थान होते. विठू माऊलीच्या ओढीने संपूर्ण महाराष्ट्र भक्तीरसात न्हाऊन निघतो.

शेतकऱ्यांसाठी हा महिना अत्यंत महत्त्वाचा असतो. आषाढात पडणाऱ्या पावसामुळे शेतात पेरणी आणि लावणीच्या कामांना वेग येतो.




आषाढ शुद्ध प्रतिपदेला महाकवी कालिदास दिन म्हणून साजरा केला जातो.. तसेच या महिन्यात येणारी आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी) आणि गुरुपौर्णिमा हे मोठे सण साजरे केले जातात.

आषाढाचे आगमन म्हणजे निसर्गाच्या नवचैतन्याचा, शेतीच्या लगबगीचा आणि भक्तीच्या अथांग सागराचा त्रिवेणी संगम होय. उन्हाळ्याच्या काहिलीने व्याकुळ झालेल्या धरणीला शांत करतो. हा केवळ ऋतू बदलाचा काळ नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा पाया आहे.

निसर्गाचे अलौकिक रूप आणि सृजनाचा सोहळा-

आषाढ महिना सुरू होताच आकाशात काळ्याकुट्ट मेघांची गर्दी होते. मेघ मल्हाराच्या सुरांमध्ये पावसाचे आगमन होते.

धरेचे रूप पालटते- रखरखीत उन्हात होरपळलेली जमीन पहिल्या पावसाने सुखावते. मातीचा सुगंध चोहोकडे पसरतो.

हिरवे शालू- डोंगर-दऱ्या हिरव्यागार गवताने नटतात. धबधबे प्रवाहित होतात.

काव्यात्मक वातावरण- हा महिना कवी मनाला भुरळ घालणारा आहे. महाकवी कालिदासांनी याच महिन्यातील पहिल्या मेघाला दूत बनवून आपले अमर काव्य मेघदूत रचले होते. म्हणूनच आषाढ शुद्ध प्रतिपदेला कालिदास दिन साजरा केला जातो.

शेतकरी आणि कृषी संस्कृतीची लगबग




शेतकऱ्यांसाठी आषाढ हा अत्यंत महत्त्वाचा आणि कष्टाचा महिना असतो.

पेरणीची घाई- मृग नक्षत्रात झालेल्या पावसावर शेतकरी खरीप पिकांचे नियोजन करतात. आषाढ लागताच सोयाबीन, कापूस, तूर आणि बाजरीच्या पेरण्या पूर्ण केल्या जातात.

भाताची लावणी- कोकण आणि मावळ भागात या महिन्यात मुसळधार पावसात भात लावणीची कामे वेगाने सुरू होतात. चिखलात उभे राहून गाणी गात चाललेली ही लावणी कृषी संस्कृतीचे सौंदर्य दाखवते.

वारी आणि भक्तीचा मळवट

महाराष्ट्राच्या संदर्भात आषाढ आणि पंढरपूरची वारी हे समीकरण वेगळे करताच येत नाही.

भक्तीचा महापूर- संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालख्यांच्या प्रस्थानाने आषाढाची सुरुवात होते. लाखो वारकरी ''ज्ञानोबा-तुकाराम'' च्या गजरात शेकडो किलोमीटरची पदयात्रा करतात.

आषाढी एकादशी- आषाढ शुद्ध एकादशीला (देवशयनी एकादशी) वारी पंढरपुरात पोहोचते. चंद्रभागेच्या वाळवंटात अवघा विठ्ठलमय झालेला समाज एकत्र येतो. हा सोहळा समता आणि बंधुभावाचे जगातील सर्वात मोठे उदाहरण आहे.

धार्मिक सण आणि चातुर्मासाची सुरुवात-

धार्मिक दृष्टिकोनातून आषाढ हा संथ, संयमी आणि व्रतवैकल्यांचा महिना मानला जातो.

चातुर्मास प्रारंभ-

आषाढी एकादशीपासून हिंदू धर्मात चातुर्मासाची (चार पवित्र महिने) सुरुवात होते. या काळात अनेक लोक सात्त्विक आहार आणि उपवास करतात.

गुरुपौर्णिमा-

आषाढी पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतात. आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या गुरूंबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो.

दीपपूजन- आषाढ अमावस्येला गटारी म्हणून काही भागात ओळखले जात असले, तरी पारंपरिकदृष्ट्या या दिवशी घरातील सर्व दिव्यांची पूजा करून दीप अमावस्या साजरी केली जाते.


ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ

Sanjay Vyapari

Scan to pay with any UPI app

## नवोदित साहित्यिकांसाठी सुवर्णसंधी

ज्योतिर्मय साहित्य महाराष्ट्रातील सर्व नवोदित लेखकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ म्हणून पुढे येत आहे. फक्त साहित्यावर आधारित महाराष्ट्रातील एकमेव ई-दैनिक ज्योतिर्मय साहित्य हे आहे.

मागील दीड वर्षात या व्यासपीठावरून साधारण 150 + साहित्यिक तयार झाले आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

नवोदित साहित्यिक या व्यासपीठावरून बिनधास्त लेखन करू शकतो कारण त्यांना योग्य मार्गदर्शन करणारी टीम येथे आहे. याचा अनुभव मागील वर्षात अनेक साहित्यिकांनी घेतला आहे. त्यांचे साहित्य या व्यासपीठावरून त्यांचा फोटो व मोबाईल क्रमांकासह देण्यात येते. त्यामुळे वाचक त्यांच्याशी थेट संपर्क करू शकतो.

ज्योतिर्मय च्या व्यासपीठावरून कोणीही आपले विचार मांडू शकतो, त्यांच्यासाठी अट फक्त एकच आहे. त्यांना रुपये पाचशे भरून वार्षिक सदस्यता घ्यावी लागते, नंतर ते वर्षात संपूर्ण 365 दिवस या व्यासपीठाचा वापर करू शकतात.

मित्रांनो मग वाट कसली बघता लगेच ज्योतिर्मय साहित्य चे मेंबर व्हा व लिहिण्यास सुरुवात करा, तुमचे उज्वल भवितव्य लवकरच येथे घडणार आहे.

@ संजय व्यापारी,
संपादक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे
वार्षिक वर्गणी 7743918559 या नंबरवर किंवा दिलेल्या QR Code वर ऑनलाईन पाठवा. व पैसे भरल्याचा स्क्रिनशॉट पाठवा.



## जात्यावरच्या ओव्या......

एका मायचे लेकर
दिठ उतरून ठेवा
जणू मांडून ठेवला
तबकात सुका मेवा ||७४५||

एका मायचे लेकर
बसले एका पंगतीला
शिरा वाढणारा ला
शीण वाढून आला ||७४६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ५०

ज्योतिर्मय साहित्य

**क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे।**
**न लिंपे कदा दंभ वादे विवादे।।**
**करी सुखसंवाद जो उगमाचा।**
**जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।५२।।**

अर्थ : खरा भक्त तत्वचिंतनात वेळ घालवतो. अहंकार, दंभ आणि वादविवादात तो वेळ घालवत नाही किंवा त्यात गुंतून पडत नाही. तो उगमाचे म्हणजे आपल्या मूळ स्वरूपाचे चिंतन करून स्वतःशी किंवा इतरांशी सुखसंवाद साधतो असा भक्त परमेश्वराचा खरोखरच धन्य असा भक्त होय.

(क्रमी - वेळ घालवतो, तत्त्वचिंतन - परमात्मस्वरूपाचे चिंतन, अनुवाद - आचरण /अनुकरण, लिंपे - लिप्त होत नाही किंवा दोष लावून घेत नाही, दंभवाद - फसवा युक्तिवाद, विवाद - निष्फळ वाद, उगम - मूळ स्वरूप )

विवेचन :


खरा भक्त आपला वेळ कसा घालवतो हे समर्थ पहिल्या आणि तिसऱ्या ओळीत सांगतात तर भक्ताने कसे असू नये हे दुसऱ्या ओळीत त्यांनी सांगितले आहे.

क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादे...

साधकाचे अंतिम ध्येय परमेश्वराला प्राप्त करून घेणे हे असते एकदा त्याने ही गोष्ट आपल्या मनाशी निश्चित केली की मग त्याचे चिंतन करण्यातच तो आपला वेळ घालवतो. त्याव्यतिरिक्त जो इतर गोष्टींमध्ये आपला वेळ घालवतो तो खरा साधक नव्हेच ! तो मूळ तत्वाचे म्हणजे परमेश्वराचे चिंतन करतो. याच ओळीत अनुवादे हा शब्द आला आहे याचा अर्थ नीट समजून घ्यायला हवा. साधारणपणे अनुवाद म्हणजे भाषांतर असे आपण समजतो परंतु या ठिकाणी त्याचा अर्थ आचरण किंवा अनुकरण असा घ्यायला हवा. म्हणजे ज्याला परमेश्वराच्या मूळ स्वरूपाचे ज्ञान झाले आहे तो साधकाने जसे वागायला हवे तसेच वागत असतो. आपल्या गुरूंनी किंवा आपल्या श्रेष्ठ ग्रंथांनी जी गोष्ट सांगितली आहे, त्याचे अनुकरण करत असतो. त्याचा अनुभव घेत असतो. ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाबद्दल एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले जाते. म्हणजे केवळ ज्ञानेश्वरीवाचून उपयोग नसतो तर त्याप्रमाणे वागून त्या ओवीची अनुभूती घेणे, अनुभव प्राप्त करणे हा त्याचा अर्थ आहे आणि खरा भक्त तेच करत असतो.



असा भक्त निष्कारण वादविवादात गुंतून पडत नाही. आपल्याला थोडेफार ज्ञान झाले, काही मोजक्या ग्रंथांचे आपण वाचन केले म्हणजे आपल्याला फार कळते आहे असे आपल्याला वाटू लागते. मग आपण ते दाखवण्यासाठी समोरच्या व्यक्तीशी वादविवाद करत बसतो आणि मी किती श्रेष्ठ आहे, मला किती कळते हे अप्रत्यक्षपणे दाखवण्याचा प्रयत्न करत असतो. खरा भक्त बोलतो, गातो ते फक्त परमेश्वराबद्दल बोलण्यासाठीच. त्याचीच महती तो गात असतो. म्हणून तो व्यर्थ वादविवादात पडत नाही किंवा त्यात स्वतःला गुंतवून घेत नाही. **(क्रमशः)**



### उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२



## || अभंग-माधव ||

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



------- श्रीहरीचे रूप ------

पाहुनी गोजिरे । श्रीहरीचे रूप ।
मोद मनी खूप । दाटू लागे ॥१॥
नितळशी कांती । मोती माळ गळी ।
नाम शोभे भाळी । रेखीवसे ॥२॥
विपुल कुंतली । शोभे मोरपीस ।
मोहवी मनास । हरी रूप ॥३॥
माधव हा म्हणे । ठेवा मजवर ।
कृपा निरंतर । दामोदरा ॥४॥

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559




### अंतर

अंतर हे दुरी मोजण्याचे साधन व अंतर म्हणजे दुरावा. आपल्या माणसांत कधीच दुरावा निर्माण होऊ देऊ नये, दुरावा हा गैरसमजा मधून होतो त्यामुळे कोणाचे ऐकून लगेच त्यावर विश्वास ठेवू नये. योग्य अंतर कधीही फायद्याचे ठरते.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

## काळजीचे मूळ कर्तेपणात आहे



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

आनंद पाहायला आपल्याला दुसरीकडे कुठे जावे लागते का ? नाही. जो स्वतःच आनंदरूप आहे त्याने आपण होऊन ‘ मी दुःखी आहे ’ असे मानून घेतले आहे. एकजण आपले तोंड आरशात पाहायला गेला, पण त्याला ते दिसले नाही. त्यावर दुसरा एकजण म्हणाला, ‘ मी दाखवितो. ’ असे म्हणून आरशावर मळ बसला होता तो पुसून, त्याने आत पाहायला सांगितले, तेव्हा तोंड स्वच्छ दिसले. त्याचप्रमाणे साधू लोक करीत असतात. ते आपल्याला सांगत असतात की, तूच ब्रह्मरूप आहेस; म्हणजे तू स्वतःसिद्ध आणि आनंदरूप आहेस. परंतु आपण काय करतो, की हा प्रपंच माझा आहे असे समजतो, आणि त्यामुळे त्यांतले सर्व सुखदुःख आपण आपल्यावर लादून घेतो. ज्याने तो उत्पन्न केला त्याला तो रक्षण करण्याची शक्ती असते आणि तो ते आपल्या इच्छेप्रमाणे करीतही असतो; पण तिथे आपल्यावर कर्तेपणा ओढून घेऊन आपण सर्व काळजी करीत बसतो. वास्तविक आपल्या हाती काय आहे ? परमात्म्याला काय करायचे ते तो करीत असतो, आपण मात्र काळजी करून शीण करून घेत असतो. म्हणूनच काळजी सोडून देऊन आपण भगवंताला शरण होऊन राहावे. आपण त्याचे होऊन राहिले म्हणजे आपल्याला सुखदुःख होत नाही, आणि मग आपल्याला त्या आनंदाचा लाभ मिळतो.

काळजी ही मोठी विलक्षण असते. एका माणसाला आपल्या मुलाला चांगली नोकरी लागावी याची काळजी होती. पुढे त्याच्या मनाप्रमाणे नोकरी लागल्यावर, त्या मुलाच्या लग्नाची काळजी सुरू झाली. काही दिवसांनी लग्न झाले; मग पुढे सून चांगली वागत नाही म्हणून काळजी लागली. नंतर तिला मूल होईना म्हणून काळजी लागली. काही दिवसांनी तिला मूल झाले; त्या मुलाला फिट येऊ लागली म्हणून त्याला काळजी लागली. शेवटी आणखी काही दिवसांनी मुलाची फिट बरी झाली. पण त्या म्हाताऱ्यालाच फिट्स् येऊ लागल्या, आणि अखेर काळजी करीत करीतच तो मरून गेला. काळजी ही आपल्याला भगवंतापासून खरेच काळाच्या स्वाधीन करते. आपण काळाच्या स्वाधीन झालो की आपली बुद्धी भ्रष्ट होते. खरे म्हणजे काळजीचे मूळ माझेपणात आणि कर्तेपणात आहे, आणि खुद्द कर्तेपणाचे मूळ भगवंताच्या विस्मरणात आहे. व्यवहारी माणसे मोठी हुशार असतात; भगवंताला साक्षी ठेवून काळजी करतात ! हा तर त्याच्याहिपेक्षा मोठा गुन्हा आहे. ‘ काळजी लागणे स्वाभाविक आहे ’ ही कल्पनाच आधी आपण मनातून काढून टाकली पाहिजे. आपली काळजी का सुटत नाही ? या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. काळजीने आपल्याला धरण्याच्या ऐवजी आपणच काळजीला घट्ट धरून ठेवतो, मग ती सुटणार कशी ? ज्याने भगवंत आपलासा करून घेतला त्याला काळजीचे कारण उरत नाही.

संकट आले तर काळजी करू नये. भगवंत करतो ते आपल्या हिताचे करतो ही दृष्टी ठेवावी.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर, पुणे

### आपले सण,आपलेउत्सव वट सावित्री पोर्णिमा

पुढे.....

तिच्या मधुर वाणीने संतुष्ट होत यम तीला म्हणतो, मी तुला आणखी एक वर देतो.

यावर सावित्री त्यांना वाकून नमस्कार करते, व म्हणते, अहो वरदायी आपण मला हवा असलेला वर दिला आहे. त्याप्रमाणे आपणास सत्यवानास जिवंत करावे लागेल. तरच तो वर सिद्ध होईल. यम त्याच्या पाशातून सत्य वानाची सुटका करतो. तो मोठ्या मनाने सावित्रीला म्हणतो, तुझा पती तुझ्या पवित्र्यामुळे आज मरणाच्या दारातून मुक्त झाला आहे. त्याला तू तुझ्या घरी घेऊन जा. तू सुखाने त्याच्याशी संसार कर. तो सदैव निरोगी व समाधानी जीवनात तुझ्या सोबत राहू शकेल. तुम्ही 400 वर्ष राहाल. यज्ञ यथा स्थितपणे कराल. तुमच्या नंतरच्या पिढीचे लोक साम्राज्यावर राज्य करतील. तुझ्या पित्याची मुले ही, मोठे शूरवीर क्षत्रिय म्हणून नावाजतील. यानंतर सावित्री लगबगिने परत त्या वडाच्या झाडा पाशी आली. जिथे सत्यवानाचे शव पडून होते. तिने सत्यवानाचे मस्तक आपल्या मांडीवर घेतले. हळूहळू सत्यवानाचा श्वास सुरू झाला. काही वेळाने त्याने डोळे उघडले, व तो उठून बसला. (क्रमशः)

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### "काळ-काळजी आणि देव"

आज आपल्या तरंगमधे थोडक्यात काळ-काळजी व देव किंवा भगवंत यांचा संबंध माहिती कार्यकारण - भाव याबद्दल बोलू!ईथं काळ म्हणजे आजची स्थिती किंवा दशा या अर्थाने.. म्हणजे आपणास जीवन जगताना संसारप्रपंच्यात काळजी फार असते. काय होईल, कसं होईल ही चिंता करत असतो. बघा.. पटते का. लग्नाची काळजी, नोकरी पैशाची, घरादाराची, मुलेमुली नातवंडं यांच्या फिकिरी वगैरे. तर देवभगवंत
किंवा संत म्हणतात,"आपण
आपला प्रपंच संसार म्हणत काळजी करत शीण म्हणजे दुःख करतो! वास्तविक तुमचं असं काहीच नसतं!! म्हणून गीतामाऊलीत हेच सार आहे
"कर्म तुझे ते करत रहा, फल देणारा तर आहेच की वर बसलेला. "म्हणून काळजीचे मुळ मी-माझे-माझेपणा व कर्तेपणात दडलेले आहे!यावर कडी म्हणजे जास्त अक्कलवान व्यवहारी माणसे "रामाला"साक्षी ठेवून काळजी करतात.. आताबोला ही घोडचूक करू नये.कारण ईश्वर आपला म्हंटले की, काळ, काळजी, सुखदुःखे,ज कमीजास्त, तुझेमाझे असे नसते!असे हे गणित आहे. संकटे विघ्ने अडचणी आल्या तरी त्याने धाडल्या एवढा आत्मविश्वास हवा.बस आज एवढी काळजी व देवाची भुमीका याविषयी पुरे करतो वाचकहो, तुम्ही मात्र काळजी करू नका, काळजी घ्या आणि "जोतिर्मय अंक व सुखदुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा "स्वस्थ राहा मस्त राहा. गुड मार्निंग गुड डे. 🌹🌹

## || श्री दत्त महिमा ||



लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड



## दत्त दिगंबर श्री अवधूत स्वामी दिगंबर श्रीअवधूत

ज्योतिर्मय साहित्य

दत्त महाराजांच्या विशाल अशा दत्त संप्रदायाचा प्रारंभ विश्वाच्या निर्मितीचे प्रमुख ब्रह्मदेवाच्या उत्पत्तीपासून सुरू होतो तो अशा प्रकारे की ब्रह्मदेवाचे दहा मानसपुत्र मरीची, अत्री, अंगिरा, पुलस्य, पुलह, क्रतु, भ्रृगू, वशिष्ठ, दक्ष आणि नारद तसेच कर्दम ऋषी व देवहुती यांच्या नऊ कन्या व एक पुत्र ज्यात कला, अनुसूया, श्रद्धा, हवीर्भू,

गती, क्रिया, ख्याती, अरुंधती, आणि शांती सह एक पुत्र कपिल महामुनी.

दोन्ही माता-पित्यांची संतती संख्या दहा होती हा एक योग दोघांच्याही द्वितीय संतती अत्री ऋषी व सती अनुसया दोघांच्याही नावाचे आद्याक्षर

हे वर्णमालेतील प्रथम अ हेच आहे काही एक सुंदर योग.

अशा या थोर विभूती अत्रि ऋषी व अनुसया माता यांचे चरित्र सर्वांना माहिती आहे, त्यांना संतान प्राप्ती नसल्याने त्यांनी प्रखर तपश्चर्या केली त्याचे फळ म्हणून विश्व नियंते ब्रम्हा, विष्णू आणि महेश या त्रिदेवांनी त्यांना एकत्रितपणे वर दिला तथास्तु म्हणून पुत्ररूपाने आम्ही आपणाकडे अवतीर्ण होण्याचे वरदान दिले व आपले स्वत्व अर्पण केले अंश रूपाने त्रिदेवांनी दान दिल्याने त्यांचे नामकरण दत्त असे झाले. दत्त म्हणजे देणे येथून प्रारंभ झाला दत्त संप्रदायाचा. जसे निसर्ग दत्त म्हणजे निसर्गाने दिलेले वाचादत्त म्हणजे वाचेने दिलेले अशाप्रकारे दत्त संप्रदायाचा प्राचीन काळी स्वरूप वर्णन एकमुखी षडभुज मूर्ती असेच स्वरूप होते. अगदी अर्वाचीन काळात साधारण एक हजार ते अकराशे वर्षापासून दत्त महाराजांची मूर्ती स्वरूप त्रिमूर्ती झाल्याचे आढळते. ज्या दत्तभक्तांना दत्त महाराजांचे दर्शन झाले संत एकनाथ सर्वज्ञ दासोपंत यांना एक मुखी दत्तात्रेयांनी दर्शन दिले असा उल्लेख आढळतो. त्यांचे आराध्य दैवत एकमुखी दत्तात्रेय आहेत. दत्त महाराजांचे प्राचीनत्व शोधताना भगवान विष्णूंचे दशावतार पैकी सर्व अवतारात दत्त महाराजांचे स्थान आढळते. नरसिंह अवतारात भक्त प्रल्हाद यांना दत्त महाराजांनी दर्शन दिल्याचा उल्लेख आढळतो नंतर वामन अवतार व परशुराम अवतार यातही दत्त महाराजांचा उल्लेख आढळतो. परशुराम यांचे तर ते गुरु असल्याचा उल्लेख आहे. त्यांचे समकालीन कार्तवीर्य सहस्त्रार्जून यांचे ही गुरु पद दत्त महाराज यांनी भूषवल्याचे आढळते नंतरच्या काळात प्रभू श्री रामचंद्र यांनी आपल्या वनवास काळात अत्रि आश्रमात दत्त महाराजांचे दर्शन झाले असा उल्लेख आढळतो.

अत्रीचीया आश्रमाप्रती येता झाला जनकजापती
तेणे देखिली कैवल्य मुर्ती नाश कलपान्ति असेना

असा उल्लेख रामायण मध्ये दिसतो. दत्त महाराजांच्या शिष्य मंडळी मध्ये सर्व प्रकारचे साधू संत कृषी ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र असे चारी वर्णातील लोक आढळतात म्हणजेच दत्त संप्रदाय सर्वसमावेशक होता व आहे वरील सर्व विवेचनावरून हे सिद्ध होते की दत्त संप्रदायाचे प्राचीनत्व दशकात शतकात नव्हे तर युगात आढळते.

सत्ययुग त्रेतायुग द्वापारयुग व कलियुग या चारही युगात त्यांचे अस्तित्व आहेच उर्वरित कथन पुढील भागात पाहणारच आहोत

गुरुदेव दत्त कृपा करा

## प्रभातपुष्प

### षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे (काव्यसंध्या)
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

सुंदर ते रुप

सुंदर ते रुप
पंढरपुरी आहे छान
सदैव विठूस पुजते
भाव भोळा माझा
मनी वसे खरा
सुखाचे मागणे मागते

सुंदर ते रुप
पाहता भान हरपते
हरी नाम मुखी
विठूची कृपा मजवरी
म्हणूनी आहे पहा
जीवनात मी सुखी


# लाडका विद्यार्थी

**ज्योतिर्मय साहित्य**



साधारणपणे ३० वर्षापूर्वीचा प्रसंग असावा. आमच्या त्यावेळच्या मुख्याध्यापकांनी मला कार्यालयात बोलवले. त्यांच्या हातात जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे परीपत्रक होते. त्यावेळी तालुका स्तरावर प्रदर्शन नसे. ते म्हणाले,सर  हे परिपत्रक जरा उशीराच मिळाले पण उद्या जिल्हा स्तरावर आपल्याला विद्यार्थी घेऊन या मेळाव्यास जायचे आहे. मी हो तर म्हणालो पण उपकरण निर्मिती, सादरीकरण करणारा विद्यार्थी तयार करणे, पालकांची परवानगी हे सर्व अर्ध्या दिवसात करून सकाळीच जावे लागेल म्हणून थोडी काळजी वाटत होती. आम्हां सर्व विज्ञान शिक्षकांच्या डोळ्यासमोर एकदम अभिजित हा एकमेव दिसू लागला. कोणत्याही कामाला हो म्हणणारा, सकारात्मक, आज्ञाधारक, विनयशील, उत्साही, हजर जबाबी, हुशार जणू कोहिनूर हिराच. त्याचे पालक सुद्धा परवानगी देतील याची खात्री होती. मग आम्ही काही तासात घरीच तयारी केली. पृथ्वीचे ओझोन आवरण हे उपकरण होते. त्याने तयारी पण छान केली. ओझोन वायूचा थर ही संकल्पना पूर्णपणे आत्मसात करून घेतली. त्याच्या मनातील शंकांचे आम्ही समाधान केले.सकाळी आम्ही दोघे प्रवासाला निघालो. तेथे गेल्यावर त्याने आपले उपकरण किती महत्वाचे आहे हे हावभाव करत, समर्पक शब्दात पटवून दिले. सर्वच विज्ञानप्रेमी उत्सुकतेने ऐकत होते. प्रश्न मंजुषा, समयस्फुर्त भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इ.सर्व स्पर्धेत त्याने भाग घेतला.अवघ्या दोन दिवसात सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचा तो लाडका झाला. त्याचे अनेक मित्र झाले. सर्वांच्या टाळ्या मिळविल्या. प्रमाणपत्र, ट्रॉफी, बक्षिसे घेऊनच आम्ही शाळेत आलो. सर्वांची खूप शाबासकी मिळवली. त्यानंतर अनेक बक्षिसे मिळवली. अशीच विजयी घौडदौड १० वी पर्यंत सुरू होती. मग तो विषय,स्पर्धा कोणतीही असो. पुढील दोन/ तीन विज्ञान प्रदर्शनात तेथील शिक्षक व विद्यार्थी म्हणत, अभिजित आला का ? मग आमचा नंबर येणं कठीण ?.एवढा आत्मविश्वास असणारा विद्यार्थी होता अभिजित. त्यानंतर त्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. एक नामवंत वकील म्हणून त्याच्या जीवनाची वाटचाल सुरू झाली. विविध सामाजिक, शैक्षणिक संघटना यात तो कार्यरत आहे. एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून त्याची नगरात ओळख आहे.आजही भेटल्यावर तो नम्रपणे नमस्कार करून संवाद साधतो. मागील आठवणी कथन करतो. आपल्या गुरुजनांची आपुलकीने चौकशी करतो. जीवनात शिक्षण आणि संस्कार याची उत्तम सांगड त्याने घातली आहे. म्हणूनच तो लोकप्रिय झाला. त्याची अशीच उत्तरोत्तर प्रगती होवो व शाळेचे नाव उंचावले जावो हीच प्रार्थना. असा आहे आमचा लाडका विद्यार्थी अभिजित.!

अरविंद कुळकर्णी
(सेवानिवृत्त गणित शिक्षक)
भ्रमण. - ९८२२६४२२९४



# अलीकडे ये मला पलीकडे ने

**ज्योतिर्मय साहित्य**




आळंदी येथून संत ज्ञानेश्वर माऊलीची व देहु येथून जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पायी दिंडी सोहळा पंढरपूर कडे जात आहे भक्त गण भक्ती रसात चिंब न्हाऊन निघाले आहेत. प्रत्येकाच्या मुखात भिडे आसंमती ध्वजा वैष्णवांची ।

उभी पंढरी आज नादावली ।।
तुझे नाम ओठी तुझे रुप ध्यानी ।
जीवाला तुझी आस का लागली ।।

असे गोड अभंग गात माऊली माऊली चा जयघोष करत पंढरीच्या दिशेने निघाले आहेत.

आषाढी वारी जाताना ती वाट नागमोडी । पालखीच्या सोहळ्यात वारकरी खेळतात फुगडी ।। अशा आनंदाने स्त्री -पुरुष फ गड्या खेळत पाऊले चालत आहेत.पंढरीत युगानुयुगे भक्त पुंडलिका साठी पांडुरंग उभा आहे. भक्त पुंडलिकांनी आई-वडिलांची सेवा मनोभावी केली. त्यांच्यावर प्रसन्न होऊन प्रत्यक्ष पंढरीचा पांडुरंग त्यांना भेटण्यासाठी तेथे आले. पंढरीचा विठ्ठल हा दयाळू आहे.तो भक्तांना पावतो. व्यवसायात बरकत देतो. त्यामुळे एका ठिकाणी पत्नी-पतीला विनवणी करते. धनी मलाही दाखवा ना विठुरायाची पंढरी... असे गोड अभंग गात पंढरीचा महिमा गायला जातो. वारकऱ्यांचं माहेर पंढरी आहे. माहेराला जाताना त्यांना विठ्ठलाची आस आहे. **(क्रमशः)**



प्रा.बरसमवाड विठ्ठल गणपतराव
अध्यक्ष:विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड जि. नांदेड

# व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी महाविद्यालयाची निवड महत्त्वाची -प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे



**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महाविद्यालयीन शिक्षणाचा काळ हा केवळ पदवी मिळविण्याचा टप्पा नसून व्यक्तिमत्त्व विकास, संस्कार, नेतृत्वगुण आणि जीवनदृष्टी घडविण्याचा महत्त्वपूर्ण काळ असतो. त्यामुळे करिअरसह व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण जडणघडण करणाऱ्या संस्थेची आणि महाविद्यालयाची निवड अत्यंत महत्त्वाची ठरते, असे प्रतिपादन सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक मिरगणे यांनी केले.

सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयात अकरावीच्या नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात ते बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या समृद्ध शैक्षणिक परंपरेची ओळख करून देत संस्थेचा इतिहास, गुणवत्तेची परंपरा, विद्यार्थिकेंद्री उपक्रम आणि उपलब्ध सुविधांची सविस्तर माहिती दिली.

प्राचार्य डॉ. मिरगणे म्हणाले की, ''महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे व्यासपीठ असते. अभ्यासाबरोबरच विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता आणि सामाजिक जाणीव निर्माण होते.'' विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध संधींचा सकारात्मक वापर करून आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अकरावीच्या ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभाग व उपक्रमांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना समृद्ध ग्रंथालय, क्रीडांगण, गोविंदभाई श्रॉफ स्मृतिस्थळ, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), स. भु. मासिक, संगीत विभाग, नाट्यशास्त्र विभाग तसेच इतर विद्यार्थी विकास उपक्रमांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. संगीत विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांनी आकर्षक सांस्कृतिक सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली. नव्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये यावेळी मोठा उत्साह दिसून आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र सपकाळ, डॉ. नागेश अंकुश यांनी केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. आनंद चौधरी, प्रभारी उपप्राचार्य डॉ. केशव अंधारे, कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तसेच  विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# वसुंधरेवरील सर्व प्रकारचे आघात थांबवा

**ज्योतिर्मय साहित्य**



पर्यावरणाची गुणवत्ता उंचावणे, पर्यावरणातील समस्या निवारण करणे, पर्यावरण संवर्धन, संरक्षण, व संगोपन या बाबत जागरूकता  निर्माण व्हावी, सर्व नागरिकांनी पर्यावरण बाबत जागरूक होऊन मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे, सिमेंट जंगले बांधणे थांबवावे,वाळू

उपसे, प्रमाणाबाहेर करणे थांबवावे, वृक्ष कत्तल थांबवावी, परिसर स्वच्छता करावी, प्लास्टिक वापर थांबवावा, पाण्याचे महत्व जाणून पावसाचे पाणी अडवावे, छतावरील पाण्याचे पुनर्भरण करावे, जंगलातील पशु, पक्षी,जंगली जनावरे यांची शिकार थांबवाबी, आणि वसुंधरेवरील सर्व प्रकारचे आघात थांबवावे हे सर्व समजून घेऊन या प्रमाणे आचरण ठेऊन निसर्ग जपावा.

माणूस हा पर्यावरणचा एक बुद्धिमान घटक आहे, मात्र या मानवांचा पर्यावरणाच्या प्रत्येक घटकात मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने पर्यावरण ही या मानवी हस्तक्षेपाला विविध प्रकारच्या मार्गानी धडा शिकवीत आहे, व माणूस त्याचे परिणाम स्वतः भोगत आहे ,व त्याचे परिणाम पर्यावरणातील ईतर घटकांना ही भोगायला भाग पाडत आहे.जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने जगातील सर्व मानव घटकांनी पर्यावरण संरक्षण व पर्यावरण संधारण यावर जास्त भर देऊन पर्यावरण जागृतीची गरज आहे. यासाठी शालेय शिक्षण स्तरावर  पर्यावरण संरक्षण बाबत सर्वंकष प्रयत्न व्हावयास पाहिजे.मानव हा निसर्गाचा महत्वपूर्ण घटक आहे, जगातील मानवांनी वृक्षारोपण, पाणी बचत, ऊर्जा बचत, वीज बचत परिसर स्वच्छता या सर्व बाबी अंगी बानवून, इतरांनाही याचे महत्व सांगून त्यांनाही या बाबी पाळण्यास लावणे गरजेचे आहे.पर्यावरण शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे.

नागरिक व शालेय विद्यार्थी यांनी एकसंघ राहून देशात पर्यावरण गुणवत्ता विकसित करावी, जनतेमध्ये पर्यावरण संरक्षण, संवर्धन, संगोपन व संधारण उर्मी  वाढवून पर्यावरण घटक राखून, आणखी वृद्धीपित होण्यासाठी सर्वंकष व सांघिक प्रयत्न झाले तर उद्याचा काळ हा मानवप्राणी, पशु, पक्षी व इतर सर्व सजीवांसाठी आरोग्यदायी राहील.

धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४






## सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H -  98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'आजी' (संस्कारांची शिदोरी)

पुढे.....

सकाळी पहाटे लवकर उठून धार्मिक वाचन, जप या गोष्टी ती नित्यनेमाने करायची. संध्याकाळी मला देवाजवळ हक्काने बसवून 'शुभंकरोती' म्हणायला लावायची आणि देवादिकांच्या रंजक गोष्टी सांगायची. आजी म्हणजे संस्कारांची एक चालतीबोलती पाठशाळाच होती.

पूर्वीच्या काळी लग्न फार लवकर होत असत. माझी आई सांगते की, तिचं लग्न माझ्या मामांनी ती अवघ्या १४-१५ वर्षांची असतानाच करून दिलं होतं. तिचे आई-वडील ती लहान असतानाच वारले होते, त्यामुळे मामांनीच तिला मायेने वाढवलं. खरं तर तिचं ते वय शाळेत जाण्याचं आणि बागडण्याचं होतं; पण परिस्थितीमुळे तिला फार शिक्षण घेता आलं नाही. लग्न होऊन नवीन घरात आल्यावर तिला स्वयंपाक वगैरे गोष्टी फारशा येत नव्हत्या.

पण माझी आजी, जी नात्याने तिची सासू होती, ती तिची खऱ्या अर्थाने 'आई' झाली! तिने माझ्या आईला अगदी पोटच्या मुलीसारखं मानून स्वयंपाकापासून प्रपंचातल्या सगळ्या गोष्टी मायेने शिकवल्या. सासू-सुनेच्या नात्याला आई-मुलीचं रूप देणाऱ्या माझ्या अशा आजीचा मला खरोखरच सार्थ अभिमान वाटतो.

आई-बाबांचे जग हे सहसा शिस्तीचं, कर्तव्याचं आणि आजच्या काळात खरं तर खूप धावपळीचं असतं. अशा वेळी घरात आजी असणे म्हणजे दुधात साखर पडण्यासारखे आहे. आई-बाबा घरात नसले, तरी पाठीशी आजी असल्यामुळे त्यांना मुलांची अजिबात चिंता नसते.

आई-बाबांच्या शिस्तीचा आणि ओरड्याचा उन्हाळा जेव्हा मुलांच्या वाटेला येतो, तेव्हा आजीच्या पदराची सावली हिमालयासारखी शीतल आणि उबदार ठरते. आईने रागवून हात उगारला की मुलं रडत जिथे जाऊन लपतात, ते जगातील सर्वात हक्काचं आणि सुरक्षित ठिकाण म्हणजे आजीची कुस! (क्रमश:)

## चंद्रभागा
### अश्रू आणि आनंदाचा संगम



अमोल बोरीकर



कित्येक दिवसांची पायपीट... उन्हाची काहिली... पावसाच्या सरी... चिखलाने भरलेले रस्ते... पायांवरील फोड... आणि ओठांवर अखंड "विठ्ठल... विठ्ठल...चा गजर. या साऱ्या प्रवासानंतर जेव्हा वारकऱ्याच्या नजरेला प्रथम चंद्रभागेचं पात्र दिसतं, तेव्हा त्याचे पाय थबकतात... हात आपोआप जोडले जातात... आणि डोळे नकळत भरून येतात. कारण त्याला फक्त नदी दिसत नसते; त्याला विठुरायाच्या भेटीची पहिली चाहूल लागलेली असते.

पंढरपूरच्या वाळवंटातून वाहणारी चंद्रभागा नदी केवळ एक जलवाहिनी नाही, तर ती महाराष्ट्राच्या भक्तीसंस्कृतीचे हृदय आहे.

भीमा नदी जेव्हा पंढरपुराजवळ येते, तेव्हा ती चंद्राच्या कोरीसारखा आकार घेते, म्हणूनच तिला अत्यंत प्रेमाने 'चंद्रभागा' म्हटले जाते. या नदीच्या तीरावर दरवर्षी भरणारी वारी म्हणजे मानवी भावनांचा, म्हणजेच 'अश्रू आणि आनंदाचा' एक अद्भूत संगम आहे

कित्येक दिवसांचा पायी प्रवास करून वारकरी जेव्हा चंद्रभागेच्या तीरावर पोहोचतो, तेव्हा त्याच्या पायांवरील फोड, अंगावरील थकवा आणि मनातील साऱ्या वेदना त्या पवित्र प्रवाहात विरघळून जातात. तो पाण्यात स्नान करतो; पण खरं तर त्याचं अंत:करणच स्वच्छ होत असतं. त्या क्षणी त्याच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे दुःखाचे नसतात; ते विठुरायाच्या भेटीच्या आनंदाचे, कृतज्ञतेचे आणि आत्मशांतीचे असतात.

संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्याही पावलांनी या तीराला स्पर्श केला होता. कित्येक शतकांपासून ही नदी भक्तांच्या अश्रूंना आपल्या कुशीत सामावून घेत आहे. म्हणूनच चंद्रभागेचं पाणी केवळ नदीचं पाणी नाही; ते लाखो भक्तांच्या विश्वासाचं, प्रेमाचं आणि समर्पणाचं तीर्थ आहे.

आज आपण आपल्या डोळ्यांतले अश्रू लपवतो. जग आपल्याला कमकुवत समजेल म्हणून रडणं टाळतो. पण चंद्रभागा शिकवते—देवासमोर ओघळलेला प्रत्येक अश्रू हा दुर्बलतेचा नाही; तो भक्तीचा सर्वात पवित्र अभिषेक असतो. ज्या डोळ्यांनी मनापासून रडता येतं, त्याच डोळ्यांना विठ्ठल मनापासून दिसतो.

चंद्रभागेत स्नान केल्यानंतर वारकरी जरी तेच वस्त्र परिधान करत असला, तरी त्याचं मन बदललेलं असतं. तो हलका झालेला असतो. कारण त्याने शरीरावरील धूळ धुतलेली नसते; तर मनावरील ओझं त्या प्रवाहात विसर्जित केलेलं असतं.

चंद्रभागेच्या लाटांमध्ये पाणी वाहत नाही... वाहतात लाखो वारकऱ्यांचे अश्रू, त्यांची श्रद्धा आणि विठ्ठलाच्या भेटीने भरून आलेल्या आनंदाची अखंड गंगा.

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे  मो.95030 45495



### सत्यम् अनंतम् शाश्वतम् ब्रह्म




पुढे....

महाभारताचा दृष्टिकोन

महाभारतात म्हटले आहे—

पुराणमित्येव न साधु सर्वं चापि काव्यं नवमित्यवद्यम्। सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्तेमूढः परप्रत्ययनेयबुद्धिः॥

■ अर्थ : जुने आहे म्हणून सर्वच चांगले नसते; तसेच नवे आहे म्हणून ते दोषपूर्णही नसते. ज्ञानी पुरुष विचारपूर्वक परीक्षा करून जे योग्य आहे त्याचाच स्वीकार करतात; मूर्ख मात्र दुसऱ्यांच्या मतावर चालतात.

हा श्लोक भारतीय संस्कृतीतील सुवर्णमध्याचा सर्वोत्तम आधार मानला जातो.

मनुस्मृतीचा संकेत. मनुस्मृती सांगते—

■ वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः।एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम्॥ (मनुस्मृती २.१२)

धर्म समजण्यासाठी चार आधार आहेत —वेद,स्मृती, सज्जनांचा आचार,आणि शुद्ध विवेकाने स्वीकारलेले अंत:करण. म्हणजेच धर्म हा केवळ परंपरेवर नाही, तर विवेकावरही आधारलेला आहे.

■ उपनिषदांचा संदेश

ईशावास्योपनिषद् म्हणते—

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा
विद्ययाऽमृतमश्नुते॥ (मंत्र ११)

अर्थ : जो व्यवहारज्ञान आणि आत्मज्ञान या दोन्हींचा समन्वय करतो, तोच पूर्णत्व प्राप्त करतो.

समन्वय हीच भारतीय संस्कृतीची ओळख आहे.  संतपरंपरेत "सुवर्णमध्य", "विवेक", "युक्ती", "देश-काल-परिस्थितीनुसार आचरण" यांना अत्यंत महत्त्व दिले आहे. संत ज्ञानेश्वर, समर्थ रामदास आणि संत तुकाराम यांनी यावर अनेक ठिकाणी प्रकाश टाकला आहे.

भारतीय संतपरंपरेने कधीही आंधळ्या रूढीवादाचे समर्थन केले नाही; तसेच स्वैर आधुनिकतेचाही पुरस्कार केला नाही. त्यांनी विवेक, समत्व आणि लोककल्याण यांनाच धर्माचे खरे स्वरूप मानले.   (क्रमश:)

# कर्तव्य निर्णय व अंमल

**ज्योतिर्मय साहित्य**

कर्तव्याच्या पलिकडे जाऊन केलेल्या कामाचे अक्षय कौतुक होत असते, मग तुमचा कोणताही व्यवसाय, छंद, असो किंवा सेवेचा प्रकार असो, आपल्या कर्तव्याचे संकल्पाचे काटेकोर पालन केले पाहिजे. कार्य करीत असतांना किंवा कर्तव्य पालन करित असतांना समाज कंटक, आपल्या विचारांशी सहमत नसलेले स्वार्थी लोक, आपले पाय ओढल्याशिवाय राहणार नाहीत असे व्यक्ती ज्याला संयमाने संघर्षासमोर जाणेची वृत्ती ठेवणे खूप गरजेचे आहे. त्याचा आपल्या कर्म सातत्यावर परिणाम न होवू देणे खूप महत्वाची बाब आहे. इतरांचे पाहून काही तरी समाजसेवा करावी अशी प्रबळ इच्छा अनेकांच्या मनात निर्माण होते. परंतु मनातील तोकड्या विचाराने गुंफलेल्या मनाला त्यामधुन सुयोग्य मार्ग सापडत नाही. आपले हे काम नाही म्हणून कर्तव्य पालनाकडे निर्भिडपणे दुर्लक्ष होते.

काही व्यक्तींना वेळ निघून गेल्यावर आपल्या कर्तव्याची जाणीव होते पण अशा प्रसंगी पश्चातापा शिवाय पदरात काहीच पडत नाही. एखाद्या घटनेबद्दल मनात उदासिनता असेल तर कर्तव्य पालन होवू शकत नाही. प्रसंगाची सत्यता कळल्यावर आपण कर्तव्य परांगमुख झाल्याबद्दल मानसिक क्लेश होवू शकतो.


सुखात साथ देणे त्याला नाते म्हणतात अन दुखा:त जे मदत करतात साथ देतात ते एक प्रकारची देवदूतच असतात. पण हे आपल्याला आपल्या कर्तृत्वातूनच ओळखणे शक्य असते. तेव्हा कोणतीही गोष्ट वेळेवर पूर्ण करुन आपले कर्तव्य निभावून आपणही आनंद लुटावा व दुसऱ्यास ही आनंद आणि समाधान मिळवून द्यावे. कर्तव्य निभावताना आपल्या आचार विचारातून, रुढी परंपरेतून, संस्कारक्षम शिक्षणातून चूक होवू देव नये तेव्हाही दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यासाठी वाचनातून इतरांच्या अनुभवाचा सखोल अभ्यास करून आपले कर्तव्य निभावण्यासाठी त्याचा उपयोग करुन घेणे केव्हाही आपल्या आत्म उन्नतीसाठी महत्वाचे आहे.

कर्तव्य निभावतांना आपला अहंकार बाजूला ठेवला पाहिजे. कारण कोणीही परफेक्ट माणूस नसतो. चुका ह्या सर्वांकडून होत असतात. त्यामुळे इतरांच्या चुका सकारात्मकतेने घ्याव्यात. वडीलधाऱ्या व्यक्तीचे अनुभवाचे बोल असतात. तत्वनिष्ठ असतात. कल्याणकारी असतात. पण काही मुले अर्ध्या हळकुंडानी पिवळे होवून अहंकाराने ग्रासले जातात आणि क्षणोक्षणो आपल्या आई-वडिलांच्या,प्रसंगी गुरुंचाही मान राखण्यास कमी पडतात. पण ते गेल्यावर त्यांची उणीव कोणीच भरून काढू शकत नाही. ह्याची जाणीव होते. पण अशा वेळी आपल्या हाती काहीच राहिलेले नसते अन पश्चातापाचे दु:ख कुरवाळीत अखंड जगावे लागते.

ह्याबद्दल मी एका मोठ्या वक्त्यांनी सांगितलेली घालमेल ऐकलेली आहे. ती अशी-

त्याला वाटते, आज मी माझ्या यशाची चमक पहात आहे ती केवळ माझ्या वडिलांमुळे पण ह्या झगमगाटामागे पश्चातापाचा अंधकार ही आहे. ह्या यशामागे एक अपयश ही अनाहूतपणे दडलेले आहे. वडिलांच्या आणि त्यांच्या विचारामध्ये एकदा मतभेद निर्माण झाले. त्यामुळे त्यांनी वडिलांशी बोलणे सोडले. दोघांमध्ये वैचारिक दरी निर्माण झाली. अंत:र्मनात प्रेम असले तरी संवाद बंद झाला होता पण हळूहळू माझ्या लक्षात आले की, वडिलांनी खरच सुकर मार्ग सांगितला होता. त्यांनी योग्य मार्गदर्शन केले होते. पण त्या मार्गाने आपण गेलो नाही त्यामुळे काही अंशी आपण उशीराने यशाच्या मार्गी अडखळत पोहोचलो. वास्तविक ही आपली चूकच झाली आहे. नियोजन पूर्वक कार्य न करता आपण घाईने चूक निर्णय घेतले होते. परदेशात असतांना त्याला ह्याची जाणीव झाली. तेव्हा आपण स्वदेशी गेल्यावर वडिलांची माफी मागावी हा विचार मनात बळावत गेला. तरीपण दरवर्षी तो भारतात आल्यावर अमलात आणू शकलो नाही. ही माझ्या मनातील अहंकाराची शोकांतीका आहे. कारण वडीला समक्ष मी चुकलो आहे, हे मी बोलू शकलो नाही. मग त्यांची भीती वाटणे हे ही एक कारण होवू शकते किंवा अहंकाराची जागृती असू शकते. किंवा विनाशकाले विपरीत बुद्धि असू शकते.

**आर. पी. दुसे**
छ. संभाजी नगर 9422202747



अचानक मी परदेशात असताना वडिलांचा निरोप आला की, बाळ तू जे परदेशात लेक्चर देतोस ते मी ऐकले आहे, मला खूप आवडतात अशी तुझी व्याख्याने मी ऐकत असतो. आणि मनात प्रसन्नता होत असते. तेव्हा तू माझ्यासाठी त्या व्याख्यानाची रेकॉर्डिंग करुन मला पाठव, वडीलांनी सहजपणे आणि मौन तोडून सकारात्मकता दाखविली होती. त्यांनी त्यांचे कर्तव्य निभावले होते, पण मी मात्र त्यांना माफी मागू शकलो नव्हतो. हे माझे दुर्देव म्हणा किंवा अपयश होते असे म्हणा. मी माझ्या मनाचा मोठेपणा दाखवून त्यांना प्रतिसाद देवून आनंदी करु शकलो नाही.

आपल्याला अनायासे वडिलांनी ही संधी उपलब्ध करुन दिली ह्याचा मला मनस्वी आनंद झाला. त्याप्रमाणे मी माझे लेक्चर पेनड्राईव्ह मध्ये घेतले आणि भारतात गेल्यावर हे पेनड्राईव्ह वडिलांना द्यावे व माफी मागून आनंद मिळवावा हे मनस्वी ठरविले होते. त्याप्रमाणे मायदेशी परतण्याचे स्वप्न मी रंगवू लागलो होतो. ह्यामध्ये काही काळ गेला अन ऐके दिवशी आईचा फोनवरुन हंबरडा आला की, बाळा तुझे वडील आम्हाला सोडून गेले आहे.


माझ्या मनात हा अंधार आजही बोचऱ्या थंडीप्रमाणे सत्तावत आहे. की कर्तव्यात आपल्याकडूनच अक्षम्य हयगय झाली आहे. त्याची मोठी शिक्षा भोगावी लागत आहे. अत्यावस्थ परिस्थितीमध्ये असतांना वडिलांनी काहीतरी मार्ग काढून सकारात्मक समेटाचा मार्ग निवडला होता व प्रेमाचा ओलावा जपला होता. पण आपण कर्तव्यात दिरंगाई करुन योग्य वेळात त्याचा फायदा घेवू शकलो नाही. शरीर रुपाने वडिल निघून गेले अन आता पश्चातापा शिवाय काहीच उरले नाही. वडिलांची क्षमा मागणे राहून गेले, तेव्हा योग्य निर्णय आणि शिघ्र अंमल बजावणी अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यासाठी प्रतिकुल परिस्थितीशी संघर्ष करणे गरजेचे असून आपण कर्तव्याचा तो एक भाग मानला पाहिजे.

ह्या त्यांच्या वक्तव्यावरुन आपणही काही वेळीच शिकले पाहिजे. जे आपल्या प्रेमापोटी निर्व्याज्य,निरपेक्ष मार्गदर्शन करतात. त्या आईबापावर विश्वास ठेवून त्यांच्या उतारवयात आपल्या कर्तव्याच्या काठीचा त्यांना आपल्यातील मतभेद विसरुन आधारच दिला पाहिजे. त्याप्रमाणे आपल्या आयुष्याच्या आदर्शाच्या सिमा वाढविल्या पाहिजे व इतरांना आपण उदाहरण झाले पाहिजे कर्तव्याच्या कक्षेत राहूनही केलेल्या कामाचा प्राधान्यानी फायदाच होईल असे मला वाटते. माझ्यावर जो प्रसंग आला तो इतरांवर येवू नये, कारण एकदा तुटलेली वेळ पुन्हा कधी येणार नाही. मनाचा निर्णय झाला की, अंमलबजावणीस उशीर करु नका.

हा बहुमूल्य संदेश आपणही मनाने स्विकारला पाहिजे व त्याप्रमाणे आपल्या कृतीत उतरविला पाहिजे, तरच आनंदाचे डोही आपण आनंद मिळवू शकतो.

## चिन्हांच्या गर्दीत हरवणारे शब्द

मुकुंद भालेराव, छत्रपती संभाजी नगर
विद्युतसंदेशसंकेतसूत्र –
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाष्यक्रमांक – ८३० ८८ ३५३ १३



# भाषा जपायची असेल तर शब्द जपा (भाग ७)

**ज्योतिर्मय साहित्य**

भाषा ही केवळ व्याकरण, शब्दकोश किंवा साहित्य यांमुळे जिवंत राहत नाही. ती जिवंत राहते ती तिच्या सततच्या वापरामुळे. ज्या भाषेत लोक बोलतात, लिहितात, विचार करतात आणि भावना व्यक्त करतात, ती भाषा समृद्ध होत जाते. उलट, ज्या भाषेतील शब्द वापरले जात नाहीत, ते हळूहळू विस्मृतीत जातात.

आपण अनेकदा अभिमानाने म्हणतो,
माझा मराठीचि बोल कवतुके।
अमृतातेही पैजा जिंके।।

हे वचन उच्चारताना आपल्याला अभिमान वाटतो; पण प्रत्यक्ष व्यवहारात आपण त्या भाषेचा किती वापर करतो, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा.

हा प्रश्न केवळ मराठीपुरता मर्यादित नाही. संस्कृत, हिंदी, इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा असो, तिचे सौंदर्य तिच्या वापरात असते. आज मात्र आपण कोणतीही भाषा पुरेशी वापरत नाही. त्याऐवजी आपण चिन्हांची, इमोजींची आणि तयार प्रतिक्रियांची भाषा वापरू लागलो आहोत.

चिनी किंवा जपानी भाषेची लिपी चित्रात्मक परंपरेतून विकसित झाली आहे. त्यांच्या भाषिक इतिहासाची दिशा वेगळी आहे, पण आपली देवनागरी लिपी ध्वनीप्रधान, शास्त्रीय आणि अत्यंत वैज्ञानिक आहे. तिच्यातील प्रत्येक अक्षर उच्चाराशी जोडलेले आहे. तिचे सौंदर्य केवळ दिसण्यात नाही, तर विचार स्पष्टपणे व्यक्त करण्याच्या सामर्थ्यात आहे.

म्हणूनच एखादा संदेश मिळाल्यावर फक्त थम्प्स अप किंवा हृदयाचे चित्र पाठविण्याऐवजी दोन वाक्ये लिहून पाहा.

मला हा विचार खूप आवडला.

तुमचे मत विचार करायला लावणारे आहे.

ही माहिती उपयुक्त वाटली.

मला तू आवडतो किंवा मला तू आवडतेस.

माझे तुझ्यावर प्रेम आहे.

तू सुंदर दिसतेस,

अशा काही शब्दांनी संवाद अधिक जिवंत होतो. समोरच्यालाही आनंद होतो आणि आपली भाषाही समृद्ध होते. याहून एक पाऊल पुढे जाऊ या. बरेच दिवस झाले कुणाला पत्र लिहिले नाही? मग आजच कल्पना करा की, तुमची आई, वडील, मित्र, मैत्रीण, भाऊ किंवा लाडकी बहीण दुसऱ्या गावात राहते. तिला मनापासून पत्र लिहा. विद्युतसंदेश (ईमेल) चालेल, संदेश चालेल; पण तो शब्दांनी भरलेला असू द्या. तुम्हाला स्वतःलाच त्या अनुभवाचा आनंद जाणवेल. हरकत नाही खूप एसएमएस पाठवा, टेलिग्राम, इन्स्टाग्रामवर लिहा , फेसबुकवर लिहा, पण लिहा सदैव लिहित रहा. प्रयोग म्हणून माझ्या ह्या लेखाला प्रतिसाद म्हणून भरभरून लिहा. बघू या कोण किती लिहू शकतो / शकते.

भाषा जपण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे तिचा प्रेमाने, सातत्याने आणि जाणीवपूर्वक वापर करणे.

(क्रमशः भाग ८: शब्द, स्मरणशक्ती आणि मेंदूचे विज्ञान)

# महाकवी कालिदास

**ज्योतिर्मय साहित्य**

जागतिक वाङ्मयात कवी कुलगुरू कालिदासांचे स्थान अद्वितीय आहे. कालिदासांनी संस्कृतमध्ये सात अजरामर साहित्याची निर्मिती केली आहे.


आषाढस्य प्रथम दिवसे या मेघदूतातील उल्लेखावरून आषाढाच्या पहिल्या दिवशी कवी कालिदास दिन साजरा केला जातो. या महान कवीचे आई-वडील कोण? त्यांचा जन्म मृत्यू कधी? याविषयी कुठलाच उल्लेख किंवा जीवनावर प्रकाश झोत टाकणारी एखादी घटना त्यांच्या वाङ्मयकृतीत नाही.

ते ब्राह्मण कुळातील असावे असा उल्लेख इ.स. ६३४ मध्ये खोदलेल्या लेखात आढळतो. इसवी सन सातव्या शतकात तरी कालिदास होऊन गेले हे निश्चित ठरले असले तरी, त्यांच्या काळाबाबत विद्वानांचे एकमत नाही. कवी बल्लाळ यांच्या भोज प्रबंध या ग्रंथात कालिदासांच्या चरित्रात्मक शोध कथेनुसार कालिदासांची निर्वाण भूमी सिलोन (सिंहलद्वीप) च्या दक्षिणेकडील किरंदी नदीच्या मुखापाशी आहे.

कालिदास हे उज्जैनचे राजा विक्रम यांच्या पदरी असावे. असे काही विद्वानांचे मत आहे. कालिदासांच्या साहित्यात क्षिप्रा नदीचे आणि उज्जैन मधील बारीक, सूक्ष्म गोष्टींचे खूप सुंदर वर्णन ते करतात.

कालिदास हे अनाथ होते. त्यांचा सांभाळ एका मेंढपाळाने केला.त्यांना शिक्षणाचा गंध नव्हता; कुठल्याही प्रकारचे अनौपचारिक शिक्षण त्यांनी घेतले नव्हते. ते दिसायला अगदी सुंदर, सुदृढ होते.

त्या काळात विद्युत्तमा नावाची राजकन्या होती. तिने ठरवले की, जो शास्त्रार्थोत तिचा पराभव करेल त्याच्याशी ती लग्न करेल. अनेक देशाच्या विद्वानांना पाचारण करण्यात आले. ती दिसायला सुंदर, बुद्धिमान असली तरी गर्विष्ठ होती. तिला विद्वान वर हवा होता. त्या अहंकारा पायी तिने अनेक विद्वानांचा अपमान केला होता. तिच्यावर सूड उगवायचा म्हणून; काही विद्वानांनी कालिदासाला पाहिले व त्याचे देखणे रूप डौलदार पेहराव



चढवल्यावर अधिकच आकर्षक झाले. सर्वांनी कालिदासाला राजकन्येजवळ आणले. वादविवाद झाले. त्याची सर्व उत्तर इतर विद्वानांनी दिली. कारण कालिदासाला प्रत्यक्ष बोलण्याची गरजच उरली नव्हती. तिला वाटले कालिदास खूप विद्वान आहे. लग्न समारंभ थाटामाटात पार पडला. दिवस जसे जाऊ लागले तसे तिच्या लक्षात आले की, आपला पती विद्वान नसून अक्षरशत्रू आहे. तिने रागाच्या भरात त्याला विचारले? अस्ती कश्चित् वागर्थ (आता तरी तुझ्या वाणीत काही अर्थ गुण आले का?) त्यांनी प्रश्न ऐकून शर्मेने मान खाली घातली; तेव्हा ती त्यांना म्हणाली, तू इथून तोंड घेऊन चालता हो कसा! ठोंब्या जा. त्यांना तो अपमान सहन झाला नाही. त्यांनी काली देवीची उपासना केली चांगले अध्ययन करून विद्वान पंडित होऊनच आपल्या पत्नीला भेटायला आले. ते राजकन्येच्या नगरात आले. राजकन्येने तोच प्रश्न विचारला. अस्ती कश्चित् वागर्थ त्यांनी उत्तरा

**डॉ. योगिता देवगिरीकर-कथले**
**मो. ८९७५२९१९४०**

दाखल कुमार संभव, मेघदूत, रघुवंश ही काव्य गाऊन दाखविली अस्ती पासून प्रारंभ झालेल्या कुमारसंभावाचा पहिला चरण अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा असा होता.

कश्चित पासून कश्चित्कांता विरहागुरुणा स्वाधिकारातू प्रगत: असा होता. हा मेघादूताचा चरण वागर्थ शब्दापासून रघुवंश काव्याचा प्रारंभ वागर्थानिव संप्रक्तै असा होतो. राजकन्या त्यांची विद्वत्ता पाहून आनंदी झाली. तिने त्यांची क्षमा मागितली. पती म्हणून स्विकारलेच व गुरु सुद्धा केला मानले.

कालिदासांचे साहित्य महाकाव्य- रघुवंश, कुमारसंभव

नाटके - अभिज्ञान शाकुंतल, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र हे अजरामर

खंड काव्य - ऋतुसंहार, मेघदूत - साहित्य आहे

रघुवंश - या महाकाव्यात राजा राम व सीता पुढे लवकुश यांच्या राज्यकारभारावरचे सविस्तर वर्णन आहे.

कुमार संभव - या महाकाव्यात महादेव व पार्वती यांच्या लग्नाबद्दलची कथा आहे. पार्वतीने खूप तपश्चर्या करून महादेवाला वरले व त्यांना झालेल्या पुत्राने कार्तिकेयने तारकासुराचा वध केल्याचे वर्णन आहे.

अभिज्ञान शाकुंतल - या नाटकात दुष्यंत शकुंतलेच्या प्रेम व विरहाचे वर्णन आहे.

विक्रमोर्वशीय - हे अत्यंत प्रसिद्ध नाटक आहे याच्यामध्ये राजा पुरूरवा व उर्वशी या अप्सरेची अलौकिक प्रेम कथा मांडण्यात आली आहे.


मालविकाग्निमित्र - या नाटकामध्ये कालिदासांनी शुंग वंशाचा राजा अग्निमित्र आणि राजवाड्यातील एक दासी मालविका यांच्यातील गुंतागुंतीची आणि रंजक प्रेमकथा मांडली आहे.

ऋतुसंहार - महाकवी कालिदास यांनी रचलेले संस्कृत साहित्यातील पहिले खंडकाव्य (निसर्गकाव्य) मानले जाते. या काव्याच्या नावाचा अर्थ ऋतूंचे संकलन किंवा ऋतूंचा समूह असा आहे. यात निसर्गाचे आणि मानवी भावनांचे अत्यंत सुंदर आणि सविस्तर वर्णन केले आहे.

मेघदूत - कालिदासांचे मेघदूत हे खंड काव्य अतिशय लोकप्रिय आहे. आषाढस्य प्रथम दिवसे आषाढातल्या पहिल्याच दिवशी विरहाव्याकुळ असलेला यक्ष मेघालाच दूत बनवून आपल्या प्रिय पत्नीला संदेश पाठवतो याचे वर्णन आहे.

**(क्रमशः)**

# कालिदास - संस्कृत भाषेचे महान सर्वश्रेष्ठ कवी आणि नाटककार




**ज्योतिर्मय साहित्य**

कालच्या अंकावरून पुढे....

या कविराजांच्या अत्युच्च दर्जाच्या साहित्याचे मूल्यमापन संख्यात्मक नव्हे तर गुणात्मकरित्याच केले पाहिजे. राष्ट्रीय चेतनेचा स्वर जागवण्याचे महान कार्य करणाऱ्या या कवीचा राष्ट्रीय नव्हे तर विश्वात्मक कवी म्हणूनच गौरव करायला हवा! अत्यंत विद्वान म्हणून गणले जाणाऱ्या बाणभट्टांसारख्या त्यांच्या समकालीन साहित्यकारांनीच नव्हे, तर आजच्या काळातल्या जगभरातल्या साहित्यकारांनी देखील तो केलेला आहे! त्यांच्या जीवनाविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. त्यांच्या नांवावर असलेल्या अंदाजे ३० साहित्य निर्मितींपैकी ७ साहित्यकृती निश्चित रूपाने त्यांच्याच आहेत असे मानले जाते. असे काय वैशिष्ट्य आहे कालिदासांच्या सप्तचिरंजीवी साहित्य अपत्यांमध्ये, की पाश्चात्य साहित्यिक कालिदासांचे नामकरण ''भारताचा शेक्सपियर'' म्हणून करतात! मला तर असे प्रकर्षाने वाटते की, यात गौरव कालिदासांचा नाहीच, कारण ते सर्वकालीन, सर्वव्यापी व सर्वगुणातीत अशा अत्युच्च गौरवशिखरावर आधीच आरूढ आहेत, यात खरा गौरव आहे शेक्सपिअरचा, त्याची तुलना केली जातेय कुणाशी, तर कालिदासांशी!

**डॉ. मीना श्रीवास्तव ठाणे.**
**मो. 99201 67211**



या महान रचयित्याचे जीवन जाणून घ्यायचे असेल तर त्यांच्या साहित्याचं वाचन, मनन आणि चिंतन करावे लागेल, तेही वारंवार, कारण त्यांच्या जीवनातील बरेच प्रसंग त्यांच्या साहित्यकृतींमध्ये उतरले आहेत, अशी मान्यता आहे. उदाहरण द्यायचे तर 'मेघदूतम्' या खंडकाव्याचे, विरहाचे शाश्वत, सुंदर तथा जिवंत रूप म्हणून या काव्याकडे बघितले जाते, बरेच तज्ज्ञ मानतात की कल्पनाविलासाचे उच्चतम निकष ध्यानी धरूनही हे कल्पनातीत 'दूतकाव्य' अनुभवाच्या अभावी रचणे केवळ अशक्य आहे. तसेच कालिदासांनी ज्या अचूकतेने विविध स्थळांचे आणि तिथल्या नगरांचे सविस्तर वर्णन केले आहे, ते ही त्यांचे त्या त्या ठिकाणी वास्तव्य असल्याशिवाय शक्य नाही. कालिदासांच्या सप्त कृतींनी संपूर्ण विश्वाला समग्र भारतदर्शन घडवले! उज्जयिनी नगरीचे वर्णन तर अगदी हुबेहूब, जणू चलचित्रासारखे! म्हणूनच बरेच विद्वान मानतात की कालिदासांचे वास्तव्य बऱ्याच कालावधीकरिता बहुतेक या ऐश्वर्यसंपन्न नगरीतच असावे! त्यांच्या रचना भारतातील पौराणिक कथा आणि दर्शनशास्त्रावर आधारित आहेत! यात तत्कालीन भारतीय जीवनाचे प्रतिबिंब दृष्टीस पडते, 'रघुवंशम्' मध्ये इतिहास आणि भूगोल याविषयी त्यांचे प्रगाढ ज्ञान, त्यांच्या अगाध बुद्धिमत्तेचे आणि काव्यप्रतिभेचे द्योतक आहे यात शंकाच नाही. या भौगोलिक वर्णनासोबतच भारतातील पौराणिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक, दार्शनिक आणि वैज्ञानिक दृष्टी व ज्ञान, तसेच सामान्य तथा विशिष्ट व्यक्तींची जीवनपद्धती, या सर्वांचे यथोचित दर्शन या महान कवीच्या रचनांमध्ये आढळते. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559